admn16-17

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com
दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

वेबसाईट : www.mcaer.org
फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१४१६/१०७९ दि.०९ मे,२०१६

## परिपत्रक

**विषय:- कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारकांसाठी कृषी पदवी प्रवेश प्रक्रिया २०१६-१७ वेळापत्रक सुधारीत करण्याबाबत.**

कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारक विद्यार्थी राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षास तसेच पहिल्या वर्षास प्रवेशासाठी पात्र आहेत. याबाबतची प्रवेश प्रक्रिया दि. २ मे, २०१६ पासून सुरु झालेली असून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावयाचा अंतिम दिनांक १० मे,२०१६ आहे. तथापि, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषी तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रमाचे निकाल अद्याप जाहीर करण्यात आलेले नाहीत. यासंदर्भात सदर कृषी विद्यापीठाकडून तसेच विद्यापीठांतर्गत उमेदवारांकडून प्रवेश अर्ज भरण्याची मुदत वाढवून देण्याबाबत कृषी परिषदेकडे विनंती करण्यात आली होती.

यास्तव सदर कृषी विद्यापीठांतर्गत उत्तीर्ण होणारे कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारक प्रवेश प्रक्रियेपासून वंचित राहू नये म्हणून पदवी अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कार्यक्रम | पूर्वीचा दिनांक | सुधारित दिनांक |
|---|---|---|---|
| १. | ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावयाचा अंतिम दिनांक | १०/०५/२०१६ | २५/०५/२०१६ |
| २. | उमेदवाराने निवडलेल्या प्रवेश अर्ज स्वीकृती केंद्राकडे अर्जाची मुद्रित प्रत प्रदानाच्या पुराव्यासह (छायाप्रत) व कागदपत्रांच्या स्वयंसाक्षांकित प्रती प्राप्तीचा अंतिम दिनांक | १४/०५/२०१६ | ३०/०५/२०१६ |
| ३. | केटीपीएल व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर पहिल्या व थेट दुसऱ्या वर्षास प्रवेशासंदर्भात वर्षनिहाय अंतरिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | १७/०५/२०१६ | ०१/०६/२०१६ |
| ४. | तक्रार नोंदणीचा अंतिम दिनांक | २०/०५/२०१६ | ०४/०६/२०१६ |
| ५. | केटीपीएल व कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर पहिल्या व थेट दुसऱ्या वर्षास प्रवेशासंदर्भात वर्षनिहाय अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | २३/०५/२०१६ | ०७/०६/२०१६ |
| | **थेट दुसऱ्या वर्षासाठी प्रवेश फेऱ्या-** | | |
| ६. | (i) पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | २५/०५/२०१६ | ०९/०६/२०१६ |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | २७/०५/२०१६ (सायं. ५.३० पर्यंत) | ११/०६/२०१६ (सायं. ५.३० पर्यंत) |
| ७. | (i) दुसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. (रुपांतरासह) | ३०/०५/२०१६ | १४/०६/२०१६ |
| | (ii) रिपोर्टिंगचा अंतिम दिनांक | ०२/०६/२०१६ (सायं. ५.३० पर्यंत) | १७/०६/२०१६ (सायं. ५.३० पर्यंत) |

admn16-17

| अ. क्र. | कार्यक्रम | पूर्वीचा दिनांक | सुधारित दिनांक |
|---|---|---|---|
| ८. | जागेवरील प्रवेश फेरीसाठी रिक्त जागांच्या तपशिलाची प्रसिध्दी | ०४/०६/२०१६ | १९/०६/२०१६ |
| ९. | जागेवर प्रवेश फेरी (प्रवेश माहिती पुस्तिकेतील **परिशिष्ट 'एन'** येथील कार्यपध्दतीनुसार व परिशिष्ट 'आर' मध्ये नमूद करण्यात आलेल्या 'जागेवरील प्रवेश प्रक्रिया केंद्रा' वर फक्त) | ०६ ते १०/०६/२०१६ | २१ ते २५/०६/२०१६ |
| १०. | दुसऱ्या वर्षाचे वर्ग सुरु होण्याचा दिनांक | ०१/०६/२०१६ | १६/०६/२०१६ |

कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारकांसाठीच्या कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रकामध्ये कोणताही बदल नाही.

उक्त सुधारीत वेळापत्रकाची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**महासंचालक**

प्रति,

**कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी) / सहयोगी अधिष्ठाता (निकृशि), डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला**

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी दि. २०/५/२०१६ पर्यंत कृषी तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रमाचा निकाल जाहीर करून कृषी परिषद कार्यालयास अवगत करावे. तसेच डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्रमुख वर्तमानपत्रात वरील सुधारीत बदलास अनुसरून प्रसिध्दी द्यावी.

प्रत:-

१. कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी) / सहयोगी अधिष्ठाता (निकृशि), महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी जि.अहमदनगर / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

यांना सूचित करण्यात येत की, सदर परिपत्रक कृषी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर, सूचना फलकावर प्रसिध्द करावे.

२. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८

यांना सूचित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे व सुधारीत वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रिया राबवावी.

३. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.

यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.